Review Of Research
ISSN 2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 11 | Aug - 2015

# अंगणवाडी मधील बालकांच्या पोषण दर्जाचे स्थिती

Dr. Anjali Chandrakant Pande
Associate Professor , Department of Home-Economics ,
Narayanrao Rana Mahavidyalaya,Badnera, Distt.-Amravati.

## प्रस्तावना



सुदृढ शरीरातंच निरोगी मन वास करते असे म्हणतात! अशी सुदृढ व्यक्तीही त्या देशाची संपत्ती असते. सदृढ समाजासाठी चौरस आहार, संतुलित आहाराचे महत्त्व याबाबत लोकांमध्ये सजगता असणे गरजेचं आहे, त्याचबरोबर माता आणि बालकांची घ्यावयाची काळजी याबाबत समाजामध्ये जनजागृती होणं गरजेचे आहे.

कुपोषण हे अन्न कमी पडल्याने आणि विशिष्ट अन्नघटक कमी पडल्याने देखील होते. कुपोषण काही वेळा गैरसमजुतीतूनही होत असते. माता व बालकांना योग्य आहार व त्याचे आरोग्य व पोषण याबाबत जनजागृती करण्यासाठी शासनाने राजमाता जिजाऊ, माता-बाल, आरोग्य पोषण मिशन सुरू केले आहे.

अंगणवाडी ही मागास खेडयातील बालकांसाठी सुरू झालेली योजना होती. मुले हीच राष्ट्राचे भविष्य असतात. त्यामुळे बालकांची जडणघडण आणि विकास हेच आपले प्रथम कर्तव्य आहे. सहा वर्षाखालील मुलांचे आपल्या लोकसंख्येतील प्रमाण सुमारे 15.8% इतके आहे. या वयोगटात मुलामुलींचे परस्पर प्रमाण हजारी 927 इतके आहे. ही पिढी अनेक प्रतिकूल घटकांचा सामना करीत आहे. या प्रतिकूल घटकांचे निराकरण होऊन या वयोगटातील बालकांचे संवर्धन व्हावे म्हणून 1975 साली गांधीजयंती पासून भारत सरकारने एकात्मिक बाल विकास सेवा योजना (अंगणवाडी) सुरू केली. गेली 30 वर्षे प्रत्येक गावांत अंगणवाडी सुरू झालेली आहे. अंगणवाडी ही खास बालकांसाठी (सहा वर्षाखालील) तयार झालेली योजना असून त्यात पुढील सेवा येतात:

- पूरक आहार
- लसीकरण
- अनौपचारिक शालापूर्व शिक्षण
- आरोग्यशिक्षण व पोषण शिक्षण
- बालकांची आरोग्यतपासणी
- ‘अ’ जीवनसत्त्व पुरवठा आणि वैद्यकीय सेवा, इत्यादी.

अंगणवाडीमार्फत ह्या सहाही सेवा द्यायच्या असून, तीन वर्षाखालील मुलांना घरभेटीतून सेवा पुरवायच्या आहेत, तर तीन वर्षावरील मुलांना अंगणवाडीत तीन तास एकत्र आणून सेवा पुरवायच्या आहेत. वैद्यकीय सेवा, तपासणी, इत्यादींसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र साहाय्य करते.

अंगणवाडीत वजन तपासणी, वजन तक्ते-आरोग्यतक्ते ठेवणे, कुपोषण लवकर शोधून काढणे आणि सुधारणे, पूरक आहार – सुखदा (सुकडी), 'अ' जीवनसत्त्व डोस, शालापूर्व शिक्षण (पोषण, स्वच्छता इत्यादी विषयांवर भर) ह्या सेवा दिल्या जातात.

अंगणवाडीत फक्त तीन वर्षापुढची मुले येणे शक्य असते. यामुळे त्यापेक्षा कमी वयाची मुले योजनेच्या दृष्टीने दुर्लक्षित राहतात. कुपोषण व आजारांचे दुष्टचक्र याच लहान वयोगटात महत्त्वाचे असते. अंगणवाडी योजनेची ही एक मोठी त्रुटी आहे. मात्र तीन वर्षाच्या वरच्या गटातील मुलांना योजनेचा थोडाफार लाभ मिळतो. विशेषत: अतिकुपोषित मुलांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते असे दिसते. पण कुपोषण-अनारोग्य ज्या परिस्थितीमुळे निर्माण झाले त्याचा मुकाबला करणे जास्त महत्त्वाचे आहे.

## अंगणवाडी मध्ये पोषण दर्जा तपासण्यासाठी साधने

बालकांसाठी आरोग्य तक्ते (वजन तक्ते)

अंगणवाडीत प्रत्येक बालकाचे दर महिन्यात एकदा वजन केले जाते. आरोग्य तक्त्यातील नोंदीवरून मूल ठीक आहे, की कुपोषित आहे याचा अंदाज येतो. तसेच अचानक वजन कमी झाले तर तेही कळते. मूल कुपोषित असेल तर त्याप्रमाणे लवकर उपाययोजना करायला सोपे जाते.

अंगणवाडीत बालकाची प्रत्येक महिन्याची होणारी वजननोंद करतात. या सर्व बिंदूंना जोडणारी रेषा पाहून बाळाची एकूण प्रगती लक्षात येईल. या तक्त्यावरून अनेक गोष्टी समजतात.

पहिल्यापासून बाळाची प्रगती कशी आहे?

कधी अचानक वजन कमी झाले काय ?

बालकाच्या पोषणाचा (वजनाचा) दर्जा कोणता आहे, मूल कुपोषित आहे का? असल्यास कुपोषणाची कोणती पायरी (पहिली, दुसरी, खालची) आहे.

वजनतक्ते ठेवणे हा बालकांच्या आरोग्यसेवेतला एक महत्त्वाचा घटक आहे. पण केवळ वजन मोजणे पुरत नाही. बालकाची उंची, वाढीचे व विकासाचे टप्पे, इत्यादी गोष्टीही तपशीलवार पाहिल्या पाहिजेत.

## अंगणवाडीच्या अडचणी

- कुपोषण हटवणे ही सोपी गोष्ट नाही. ही लढाई समाजाने अंगणवाडीवर सोपवून समस्या सुटणार नाही. अंगणवाडी केवळ यासाठी मदत करते. अंगणवाडी सेवांमध्येही अनेक अडचणी असतात.
- तीन वर्षांखालील मुले आपली आपण अंगणवाडीत येऊ शकत नाहीत. कधी कधी त्यांच्या आया त्यांना जेवणाच्या वेळेला अंगणवाडीत आणतात. पण खरे म्हणजे या मुलांनाच जास्त कुपोषण असते. या विचित्र समस्येबद्दल आपण काय करू शकतो?

- पालकांचा असा समज असतो की अंगणवाडीत मुख्य आहार मिळतो. म्हणून कदाचित घरी ते मुलाला कमी आहार देत असतील. यामुळे पूरक आहाराचा योग्य परिणाम होऊ शकत नाही. अंगणवाडीत मिळतो तो आहार फक्त 'पूरक' असतो, पूर्ण नसतो हे आपण पालकांना सांगायला पाहिजे.
- अंगणवाडीत कधीकधी अन्नपुरवठा अनियमित होतो. असे मुद्दे आपण ग्रामपंचायतीसमोर आणू शकतो. अंगणवाडीत ब-याच नोंदी ठेवायच्या असतात. तिला तशी खूप कामे असतात. आणि त्यात तिचा बराच वेळ जातो. बालसंगोपन व स्त्रियांच्या आरोग्याच्या सर्व कामांत तिची खूप मदत होऊ शकते

## सर्वसामान्यपणे आहार व पोषणामधील अडचणी

खरं तर पोषण चळवळीचा मुख्य पाया आहे तो संतुलित आहार घेणे. आपण बऱ्याचवेळा पाहतो लोक संतुलित आहार घेत नाहीत. जाहिरातींना लोक जास्तीत जास्त आकर्षित होऊन जंक फुड अथवा फास्ट फुड खाण्यावर लोकांचा जास्त भर असतो. बहुतांशी महिलांना घरात मिळणाऱ्या दुय्यम स्थानामुळे शेवटी जेवणे, अन्न शिळे खाणे असे प्रकार होतात परिणामत: कुपोषण वाढत असते. फास्ट फुडचे जास्त सेवन केल्याने भविष्यात लठ्ठपणा, हायपरटेंशन, असे आजार होण्याची जास्त शक्यता असते तर कुपोषणामुळे बुटकेपणा, बारिक शरीरयष्टी असणारी मुलं पाहतो जी वारंवार आजारी पडतात. अशा मुलांचा शारीरिक विकास नीट न झाल्याने बौद्धीक विकासही नीट होत नाही. त्यामुळे आपण जे खातो तो आहार संतुलित असला पाहिजे याकडे लक्ष देणे गरजेचे कमी खा पण संतुलित खा असाच संदेश यामधून द्यायचा आहे.

## पोषण चळवळीमधील विषयांवर भर

पोषण चळवळीमध्ये प्रत्येक घटकाची वर्गवारी करण्यात आली आहे. यामध्ये गर्भवती माता, स्तनदा माता व बालक, किशोरी व कमी वजनांच्या मुलांच्या पालकांना समुपदेशनचा स्वतंत्रपणे कार्यक्रम राबविण्यात येत आहे. गर्भवती मातांना त्यांचा आहार व गरोदरपणाच्या कालावधीत घ्यावयाची काळजी तसेच बालकाचा जन्म झाल्यानंतर घ्यावयाची काळजी, तसेच किशोरवयीन मुलींना आहाराबाबत मार्गदर्शनही या उपक्रमाअंतर्गत करण्यात येत आहे. तसेच लहान मुलांचे कुपोषण दूर करण्याकरिता त्यांचे वजन, उंची वृध्दीदरपत्रक ही देण्यात येते ज्यामुळे पालकांनाही आपल्या मुलांची उंची किती असावी हे समजते त्याचे वजन किती असले पाहिजे याचीही समज येते.

## स्तनदा मातांसाठी राबविण्यात येणारे उपक्रम

ऑगस्ट महिन्यात स्तनपान सप्ताह राबविण्यात येत आहे. स्तनपान सप्ताह निमित्ताने जनजागृती करण्यावर भर देण्यात येत आहे. प्रसुतीनंतर एका तासाच्या आत बालकाला मातेच्या अंगावरील दुध पाजणे आवश्यक आहे. तसेच माता व बालकाच्या दृष्टीने देखील अत्यंत आवश्यक अशी बाब आहे. तसेच मातेच्या दुधा इतका उत्कृष्ट दुसरा कोणताही पर्याय नाही. बालक निरोगी राहण्याकरिता तसेच तंदुरुस्त असावे याकरिता मातेने बालकाला दूध वेळेवर द्यावे. बालकाच्या हालचालीवरून बालकाला भुक लागली आहे का हे देखील समजू शकते त्यामुळे पहिल्या सहा महिन्यात बालकाला वरचे पाणी देखील न देता पुर्णपणे दूध दिले जावे. सहा महिने पूर्ण झाल्यानंतर बालकाला वरील खाण्याबरोबर दोन वर्षापर्यंत आईचे दूध देणे आवश्यक आहे. याबाबतही पुर्णपणे जनजागृती या सप्ताहात करण्यात येत आहे.

## पोषण चळवळीतील नाविन्यपूर्ण उपक्रम

पोषण चळवळीमध्ये लोकसहभागातून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. जसे अक्षयपात्र या उपक्रमाअंतर्गत गावातील लोकांनी अंगणवाड्यांना फळे भाज्या यांचा पुरवठा करावा, असे आवाहन करण्यात आले या उपक्रमाला इतका चांगला प्रतिसाद मिळाला की गावातील लोक या अक्षयपात्रामध्ये आपल्याकडे अतिरिक्त

उपलब्ध असलेल्या भाज्या व फळे या अक्षयपात्रामध्ये देतात. अंगणवाडी परिसरामध्ये परसबागा तयार करणे, मटका फ्रीज मध्ये भाज्या ठेवणे मनोरंजनात्मक बैठकांचे आयोजनही केले जाते.

### माता व बाल संगोपनात लोकांना आवाहन

मातांचे व बालकांचे पोषण उत्कृष्टरित्या होण्याकरिता कुटूंबाचा व समाजाचाही सहभागही महत्त्वाचा आहे. कुटूंबाचा व समाजाचा पाठिंबा असेल तर महिलांना मोठ्या प्रमाणात मदत होईल. कारण बऱ्याच वेळा महिलांना मुलाची जबाबदारी सांभाळण्याबरोबर घरकाम, शेती, नोकरी ही कामेही करावी लागतात अशा वेळी गरोदरपण ते प्रसुतीनंतर बालकाची जबाबदारी सांभाळण अवघड होते. अशा वेळी पती, आई, वडील यांची जबाबदारी मोठी राहते तसेच समाजाकडूनही पाठिंबा असेल मुलाचे पालन पोषण करण्यामध्ये मदत होते. त्यामुळे माता आणि बालकाचे आरोग्य चांगले रहावे याकरिता सामाजिक व कौटुंबिक पाठिंबाही अत्यंत महत्त्वाचा आहे.

### एकात्मिक बाल विकास सेवा योजना

एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही देशात 2 ऑक्टोबर 1975 पासून सुरु झाली. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे उद्देश्य

- ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांच्या पोषण व आरोग्य विषयक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणणे.
- बालकांच्या योग्य शारीरीक, मानसिक व सामाजिक विकासाचा पाया घालणे.
- अर्भक मृत्यू , बालमत्यू कुपोषण व शाळा गळतीच्या प्रमाणात घट करणे.
- बाल विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी विविध विभागांमध्ये धोरण निश्चिती आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी करणेसाठी प्रभावी समन्वय कायम ठेवणे.
- योग्य पोषण आहार व आरोग्य शिक्षण याद्वारे बालकांचे सामान्य आरोग्य व पोषणासंबंधी काळजी घेण्यासाठी मातांना सक्षम बनविणे.

एबाविसे योजने अंतर्गत देण्यात येणा-या सेवांची माहिती

- पूरक पोषण आहार
- आरोग्य तपासणी
- लसीकरण
- संदर्भ सेवा
- अनौपचारिक पूर्व प्राथमिक शिक्षण
- आरोग्य व पोषण शिक्षण

एबाविसे योजने अंतर्गत लाभ देण्यात येणारे लाभार्थी

- ० ते ६ महिने वयोगटातील बालके
- ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके
- ३ वर्ष ते ६ वर्ष वयोगटातील बालके
- गर्भवती व स्तनदा माता
- किशोरवयीन मुली
- १५- ४५ वयोगटातील अन्य महिला

## एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत राबविण्यात येणा-या विविध योजना

### पूरक पोषण आहार

पूरक पोषण आहार योजने अंतर्गत 6 म. ते 6 वर्ष वयोगटातील बालके , गरोदर व स्तनदा माता, किशोरी मुली यांना लाभ देण्यात येतो. पैकी 6 म. ते 3 वर्ष वयोगटातील बालके , गरोदर व स्तनदा माता, किशोरी मुली यांना स्थानिक स्तरावर बचत गटांमार्फत उत्पादित घरपोच आहार (Take Home Ration - THR) देण्यात येतो. 3 व. ते 6 व. वयोगटातील बालकांना अंगणवाडी मध्ये बचत गटाने तयार केलेला गरम ताजा आहार देण्यात येतो. सदर योजने करीता 90 टक्के केंद्र शासनाचा व 10 टक्के राज्य शासनाचा निधी प्राप्त होतो

### ग्राम बाल विकास केंद्र ( VCDC )

- ग्राम बाल विकास केंद्र हे अंगणवाडी केंद्रात अंगणवाडी सेविकां व आरोग्य विभागामार्फत घेण्यात येते. सदर केंद्रामध्ये आहार व आरोग्य सेवा दिल्या जातात.
- ग्राम बाल विकास केंद्राचा कालावधी ३० दिवसांचा असतो. त्यानंतर ग्राम बाल विकास केंद्रामध्ये दाखल बालकांच्या वृद्धीसनियंत्रणाचा पाठपुरावा अंगणवाडी सेविकांमार्फत एक वर्षापर्यंत केला जातो.
- ग्राम बाल विकास केंद्रामध्ये ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सॅम व मॅम श्रेणीतील बालकांना ३० दिवस दाखल करण्यात येते.
- ग्राम बाल विकास केंद्रामध्ये सदर बालकांच्या मातांना आरोग्य व पोषण प्रशिक्षण दिले जाते.
- सदर ग्राम बाल विकास केंद्रे लोकसहभागातून चालविली जात आहेत.

### अंगणवाडी इमारत बांधकाम

- अंगणवाडी इमारत बांधकामाकरीता डी.पी.सी., १३ वा वित्त आयोग, नाबार्ड मार्फत निधी उपलब्ध करून दिला जातो.
- जानेवारी २०१४ पासून अंगणवाडी इमारत बांधकामासाठी खर्चाची मर्यादा र.रू. ६.०० लाख प्रति अंगणवाडी याप्रमाणे करण्यात आलेली आहे.

## निष्कर्ष

भारतातील बालकल्याणाचे गंभीर स्वत्प लक्षात घेऊन स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने देशातील गरिबी, दारिद्रय, बालमृत्युमान कमी करण्यासाठी विविध कार्यक्रमांची निर्मिती केली आहे . यापैकीच एक महत्वपूर्ण योजना म्हणून 'आय . सी . डी . एस' योजनेचा उल्लेख करता येईल . देशातील सर्व 0 ते 6 वयोगटातील बालकांच्या संपूर्ण व सर्वांगीण विकासासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आली . ही योजना सुरू करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे 0 ते 6 वयोगटातील बालकांचा सर्वांगीण विकास, गर्भवती महिला व स्तनदामाता यांना विविध सेवा पुरविणे आहे .

**संदर्भ :**


१. डॉ.विजया लाड (प्रमुख संपादक), मराठी विश्वकोश, खंड-१७ वा, महाराष्ट्र राज्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई-२००७ पृ.८२६-८२७

२. Jacob E. Sfra (Chairman of The Board), The New Encyclopaedia Britannica, Volume-3, Micropaedia, Chicago-2005. पृ.२०८-२०९

३. डॉ.जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री (संपादक), मराठी विश्वकोश, खंड-XI वा, महाराष्ट्र राज्य, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई-१९८२ पृ.४५९-४६०

४. भारत सरकार, भारत २००६, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय, नई दिल्ली-२००६ पृ.४१८

५. अनुताई वाघ, कोसबाडच्या टेकडीवरून, प्रकाशकः सौ.अरूंधती पानसे, ऋचा प्रकाशन, ठाणे-२००४ पृ.३-४

६. भारत सरकार, समेकित बालविकास सेवाएँ, महिला एवं बालविकास विभाग, मानव संसाधन विकास मंत्रालय, नई दिल्ली-१९९५ पृ.१-२

७. कित्ता पृ.४-५

८. महाराष्ट्र शासन, मार्गदर्शनात्मक पुस्तिका, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास मंडळ, अकोला. पृ.७१-७२

९. छाया जाधव, बीड शहरातील एकात्मिक बालविकास प्रकल्प अंतर्गत काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांच्या समस्यांचा अभ्यास, समाजकार्य पारंगत भाग-२ च्या अभ्यासक्रमाच्या पूर्ततेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडे सादर केलेला अप्रकाशित प्रबंध अहवाल-२००१-२००२

१०. Government of India , Integrated Child Development Services; Department of Women and Child Development, Ministery of Human Resource Development, Shastri Bhavan, New Delhi-1999 पृ.१-४

११. भारत सरकार, भारत २००६, उपरोक्त पृ.८४२

१२. http://wcd.nic.in/icds.htm 8/26/2007